५०

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

## अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक ०३]

**दिनांक : 31/07/2019** **वेळ : सकाळी 10.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे **जूलै2019 रोजी** ची मासिक सभा मंगळवार दिनांक **09/07/2019** रोजी सकाळी **11.30** वा.वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील **" राजमाता जिजाऊ सभागृह "** येथे आयोजित करणेत आली होती. सदरची बैठक दिनांक 24/07/2019 रोजी स.11.30 वाजेपर्यंत व दिनांक 31/07/2019 रोजी स.10.30 पर्यंत तहकूब करणेत आली. सदरची बैठक दिनांक 31/07/2019 रोजी स.10.30 वा. संपन्‌ झाली. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा.शर्मिला राजू बाबर | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा.केशव हनुमंत घोळवे | सदस्य |
| 4. | मा.तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 5. | मा.जावेद रमजान शेख | सदस्य |
| 6. | मा.मिनल विशाल यादव | सदस्या |
| 7. | मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 8. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / माजी उपमहापौर |
| 9. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 10. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 11. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |
| 12. | मा.नायर प्रेमकुमार शंकरन उर्फ बाबू | महापालिका स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्रीमती आशादेवी दुरगुडे, क्षेत्रिय अधिकारी, मा. श्री ज्ञानदेव जुंधारे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.श्री. संजय खाबडे-कार्यकारी अभियंता विद्युत, मा.श्री प्रशांत पाटील-कार्यकारी अभियंता(जलनि:स्सारण), मा.श्री रामकिसन लटपटे,प्रशासन अधिकारी, मा.श्री निकम मोहन.-लेखाधिकारी, मा.श्री महादेव शिंदे, सहाय्यक आरोग्याधिकारी, मा. श्री चंद्रकांत मुठाळ-उपअभियंता(स्थापत्य), मा.श्री शिवाजी चौरे-उपअभियंता(स्थापत्य), मा.श्री दिपक कुंभार,उपअभियंता(पाणीपुरवठा), मा.श्री सुभाषा काळे- उपअभियंता(जलनि:स्सारण), श्री नरोटे सुनिल-उपअभियंता(स्थापत्य् उदयान) श्रीमती मोमीन झेड.आय.-उपअभियंता(झोनिपु स्थापत्य ), श्री गायकवाड बापूसाहेब-उपमुख्य प्रकल्प व्यवस्थापक महामेट्रो, श्री जयकुमार गुजर, कनिष्ठ अभियंता(नगररचना), सौ.रोटे. सु.ल.मुख्याध्यापक-माध्यमिक विद्यालय काळभोरनगर माध्य. शाळा, श्री खामकर कल्याण-पर्यवेक्षक शिक्षण मंडळ, श्री माडे आर.एस.-का.अ.-अतिक्रमण विभाग श्री हरीदास एस.जे.-कनिष्ठ् अभियंता (झोनिपु स्थापत्य),श्रीमती पल्लवी सासे-कनिष्ठ् अभियंता(स्थापत्य), श्री गिरिश गुठे-कनिष्ठ अभियंता(स्थापत्य्) श्री मगर अशोक कनिष्ठ अभियंता(स्थापत्य), श्री मोरे प्रताप,कनिष्ठ अभियंता(स्थापत्य्), श्री पाटील एस.पी.-कनिष्ठ अभियंता(स्थापत्य), श्री प्र.गो.कुंभार-कनिष्ठ अभियंता, श्रीमती साळुंके अस्मिता-कनिष्ठ अभियंता(स्थापत्य् उद्यान) श्री श्री भोसले आर.के.मुख्य लिपिक-जनता संपर्क विभाग, श्री कोटीयाना डी.एम.आरोग्य निरिक्षक-पशुवैद्यकिय विभाग, श्री जी.आर.गोसावी.-सहाय्यक उदयान अधिक्षक- उदयान विभाग, श्री. पगार एस.जी. जनरेटर ऑपरेटर-विद्युत विभाग इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, शर्मिला राजू बाबर यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

सर्वप्रथम मा.श्री रामकिसन लटपटे,प्रशासन अधिकारी हे नियत वयोमानानुसार दि.३१/७/२०१९ रोजी सेवानिवृत्त होत असल्याने सन्मा.सभापती शर्मिला बाबर यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

तद्नंतर दिनांक ११/०६/२०१९ रोजी झालेल्या अ प्रभाग समिती सभेचा (**कार्यपत्रिका क्र.२**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

---

ठराव क्रमांक 06
दिनांक- 31/07/2019
सुचक: : मा.अनुराधा गोरखे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक मा. मीनल यादव

संदर्भ: सन्मा. सदस्य जावेद शेख यांचा दिनांक ८ जूलै २०१९ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.१४ येथील स.क्र.४९/१ हनुमान क्रिडांगणाशेजारील श्री महादेव बाळासाहेब काळभोर यांच्या मालकीच्या जागेतील महापालिकेने बांधलेले शौचालय सध्या विना वापर असल्याने सदर शौचालय काढून टाकणेस व सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 07
दिनांक 31/07/2019
सुचक: मा. अनुराधा गणपत गोरखे

विषय क्रमांक 2
विभाग : सन्मा.सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ:- सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ८/७/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

के.एस.बी.चौक फ्लाय ओव्हर ब्रीजखाली दुचाकी चारचाकी वाहनांसाठी ११ महिने करारावर प्रभाग स्तरावर पार्किंगसाठी मंजूरी करणेबाबत टाटा मोटर्स कंपनीने कामगार/ कर्मचा-यांना कंपनीने कंपनी आवारात वाहने आणण्यास मज्जाव केल्यामुळे सर्व वाहने शाहूनगर रहिवासी विभागामध्ये पार्क केली जातात त्यामुळे स्थानिक रहिवाशांना खूप त्रास सहन करावा लागत असून स्वच्छता राखता येणे कठिण झालेले आहे. सदरहु कामगारांची वाहने व फ्लाय ओव्हर ब्रीज झाल्यामुळे तेथील पर्किंगची दुरावस्था झालेली आहे त्यासाठी सोय म्हणून त्या ठिकाणी वाहनतळ निर्मितीस मान्यता देणेत येत आहे..

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 08
दिनांक 31/07/2019
सुचक: मा. अनुराधा गणपत गोरखे

विषय क्रमांक 3
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ :- सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ८/७/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

शिव शाहू शंभो उद्यानामध्ये उद्यानाच्या शेवटच्या बाजूजवळ (End point) पुरुष व महिला शौचालय बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 09
दिनांक- 31/07/2019
सुचक: मा. अनुराधा गणपत गोरखे

विषय क्रमांक 4
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ: सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ८/७/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

शहूनगर येथील अष्टविनायक मंदिर चौक ते लोहाडे हॉस्पिटल चौक या रस्त्याला पदपथाला **"स्व.अरुण दत्तात्रय वाघोलीकर पदपथ "** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 10
दिनांक- 31/07/2019
सुचक: मा. अनुराधा गणपत गोरखे

विषय क्रमांक 5
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ: सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ८/७/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

संभाजीनगर येथील सिध्दीविनायक मंदिरामागील व बर्ड व्हॅली शेजारील मोकळा भूखंड यामध्ये परिसरातील युवा खेळाडूंसाठी क्रिकेट कोचिंगसाठी मनपा नियमानुसार भाडेकरारावर (अकरा महिने) प्रभाग स्तरीय अे.के.क्लब शाहूनगर यांना देणेत यावे . सदरहू क्ल्ब महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन यांचेशी संलग्न् असून जिल्हा, राज्य् , राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंची निर्मिती होऊ शकते व मोकळया भूखंडाचा सुनियोजित वापर होऊन मनपास उत्पन्न् व शहरास खेळाडू मिळू शकतात. तरी सदरचा भूखंड त्यांना देणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 11
दिनांक- 31/07/2019
सुचक: मा. अनुराधा गणपत गोरखे

विषय क्रमांक 6
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शैलजा मोरे

संदर्भ: सन्मा. सदस्य केशव घोळवे यांचा दिनांक ८/७/२०१९ रोजीचा प्रस्ताव.

अ क्षेत्रिय कार्यालयाचे **"राजमाता जिजाऊ सभागृह"** वातानुकुलित करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती- शर्मिला राजू बाबर, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी/अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

[ शर्मिला राजू बाबर ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक:- अक्षेका/9/कावि/ 101/2019 दिनांक:- 06 /08/2019

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती, निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित -----------------------